.. ..

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १३३७/२०१५.**
**नि.क्र.७१.**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ राधाकिसन अप्पा कासार यांचा उलटतपास प्रतिवादी नं. १ तर्फे विधीज्ञ श्री. एस. एम. घुले यांचेमार्फत शपथेवर सुरु :—**

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्रमांक ३४/२ ही जमिन आमच्या शेताच्या शेजारी पुर्वेला आहे व ती प्रतिवादी नं.१ ची असुन त्याचे क्षेत्रफळ ४१ गुंठे आहे. मला जे गाळपेर क्षेत्र मिळाले आहे त्याच्या पुर्वेला सर्व्हे नं.३४/२ व ३४/३, पश्चिमेला सर्व्हे क्र.३५/१/१, दक्षिणेला सर्व्हे क्रमांक ३५/४/१ व उत्तरेला घुलेवाडी ते वेल्हाळे रस्ता आहे. मला जे गाळपेर क्षेत्र मिळाले त्याच्या पुर्वेला मथुराबाई भाउसाहेब थोरात ट्रस्टची जमिन आहे. ती जमिन सर्व्हे क्रमांक ३४ मध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत सर्व्हे क्रमांक ३४/१/१ व प्रतिवादीची मिळकत सर्व्हे क्रमांक ३४/२ ही माझ्या लहानपणापासुन पाहण्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्रमांक ३४/२ च्या पुर्वेला आजरोजी संगमनेर—नाशिक रोड आहे. हे म्हणणे खरे आहे की, संगमनेर—नाशिक रोडच्या पुर्वेला आजरोजी भाउसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना आहे. सर्व्हे क्रमांक ३४/२ मधुन संगमनेर—नाशिक महामार्ग जातो हे दाखविण्याकरीता माझेकडे कागदोपत्री पुरावा असुन तो मी अभिलेखावर दाखल केलेला आहे. मला सन १९९६ मध्ये तहसिलदार यांच्या गाळपेर एस आर ८/९६ मधील आदेशानुसार गाळपेर क्षेत्र मिळाले. हे मला माहित आहे की, तहलिसदार यांच्या सदर आदेशाविरूध्द प्रतिवादी नं.१ चे वडिल फकीरा माळी यांनी एस डी ओ, संगमनेर यांच्याकडे अपिल दाखल केले होते व त्या अपिलाचा निकाल प्रतिवादीविरूध्द लागला. हे म्हणणे खरे आहे की, तहलिसदार यांच्या सदर आदेशाविरूध्द मथुराबाई भाउसाहेब सेवाभावी ट्रस्ट यांनी एस. डी. ओ., संगमनेर यांच्याकडे रिव्हीजन अर्ज क्रमांक १००/२०१५ दाखल केला होता व त्या मधील निकालानुसार मला मिळालेल्या गाळपेर क्षेत्राचा आदेश रद्द झाला.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यासोबत दाखल केलेल्या नकाशात जी परिस्थिती दर्शविलेली आहे तशी परिस्थिती आजरोजी जागेवर नाही. मी

दाव्यासोबत दाखल केलेल्या नकाशात बाळु माळीचे जे क्षेत्र दाखविले आहे तसेच क्षेत्र सर्व्हे क्रमांक ३४ च्या पोट हिश्यांची जी मोजणी झाली आहे त्या मोजणी नकाशात दर्शविलेले आहे. सर्व्हे क्रमांक ३४ च्या पोट हिश्यांची मोजणी मथुराबाई भाउसाहेब थोरात ट्रस्टने केली होती. त्या मोजणी नकाशाची प्रमाणित प्रत मी दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे क्रमांक ३४ ची फाळणी झालेली नाही. फाळणी झाल्याबाबतचा दस्त मी अभिलेखावर दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, रिव्हीजन अर्ज क्रमांक १००/२०१५ मध्ये पारित झालेला आदेश अद्याप पर्यंत रद्द झालेला नाही. तो रद्द झाल्याबाबतचा मा. उच्च न्यायालयाचा आदेश मी सदर प्रकरणात दाखल केला आहे.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ मध्ये मला जे गाळपेर क्षेत्र मिळाले ते आज पर्यंत माझ्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या गाळपेर क्षेत्रात दोन विहीरी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्रमांक ३५/१/१ च्या पुर्व बाजुला प्रवाही ओढा होता. हे म्हणणे खरे आहे की, ओढ्याचे क्षेत्र हे आमच्या क्षेत्रापेक्षा खोलगट भागावर होते. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी सर्व्हे क्रमांक ३५/१/१ चे क्षेत्र व ओढ्याचे क्षेत्र समांतर रेषेत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गाळपेर क्षेत्र ताब्यात आल्यानंतर आम्ही ते लेव्हलींग करून कसण्या लायक केले. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी मला मिळालेले गाळपेर क्षेत्र खाचखळग्यांच्या स्वरूपातच आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्या क्षेत्राची ट्रॅक्टरद्वारे वहिती करता येत नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, बैलांद्वारे वहिती करावी लागते. आम्ही गाळपेर क्षेत्रात उस घेतला होता व तो उस आम्ही भाउसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्यात दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, उस लावतांना कारखान्याद्वारे त्याची नोंद घेतली जाते व ऊस तोडीला आला त्यावेळी कारखा–याद्वारे उसतोडीची पावती दिली जाते व त्या पावतीवर जमिनीची गट क्रमांक/सर्व्हे क्रमांक लिहीला जातो. हे म्हणणे खरे आहे की, कारखान्याकडे उसाची नोंद करत असतांना ज्या जमिनीत ऊस लावला आहे त्या जमिनीची गट क्रमांक/सर्व्हे क्रमांक कारखान्याला सांगावा लागतो. आतापर्यंत आम्ही चार ते पाच वेळा गाळपेर जमिनीत उस घेतला. गाळपेर जमिनीवर ऊस घेतला व तो भाउसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्यात दिला

हे दर्शविण्याकरीता मी अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल करू शकत नाही.

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, मथुराबाई भाउसाहेब थोरात ट्रस्ट मधील ट्रस्टींनी प्रतिवादींना गाळपेर क्षेत्रात घर बांधण्यास प्रवृत्त केले व त्यांच्या वतीने ट्रस्टचे काम सुरू आहे, ही माझी ऐकिव माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मथुराबाई भाउसाहेब थोरात ट्रस्ट मधील ट्रस्टींनी प्रतिवादींना गाळपेर क्षेत्रात घर बांधण्यास व घराला कंपाउंट करण्यास प्रतिवादींना प्रवृत्त केले, हे देखील माझी ऐकिव माहिती आहे. मी मागिल ३५ वर्षांपासुन सर्व्हे कमांक ३५/१/१ मध्ये राहत असुन प्रतिवादी क.१ मागिल १० वर्षांपासुन सर्व्हे कमांक ३४/२ मध्ये राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मागिल १० वर्षात बाळु माळीने माझेविरूध्द कोणतीही फौजदारी केस केली नाही. मला आजरोजी बाळु माळीने आमच्याविरूध्द केलेल्या फौजदारी प्रकरणाचा कमांक आठवत नाही. त्याबाबतचे कागदपत्र देखील मी दाखल करू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क.१ ने मला अनुसुचित जाती जमाती कायद्यानुसार तुरूंगात टाकण्याची धमकी नेमकी कोणत्या तारखेला दिली, हे देखील मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, बाळु माळीचे वडिल फकीरा माळी हे देखील सर्व्हे कमांक ३४/२ मध्ये रहावयास होते. हे म्हणणे खरे नाही की, गाळपेर क्षेत्रामध्ये प्रतिवादी क.१ ने बांधकाम केले असल्याबाबत मी कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. गाळपेर क्षेत्रामध्ये प्रतिवादी क.१ ने बांधकाम केले असल्याबाबतची नोंद ग्रामपंचायतला झाली का, याबाबत मी चौकशी केलेली नाही. तसेच, गाळपेर क्षेत्रामध्ये प्रतिवादी क.१ ने १२बाय५० फुट मापाच्या विहीरीचे खोदकाम केल्याबाबत ७/१२ उता—यावर नोंद झाली का, याची मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सद्यस्थितीत प्रतिवादी नं.१ च्या सर्व्हे कमांक ३४/२ मध्ये तीन विहीरी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे कमांक ३४/२ च्या लगत असलेल्या वेल्हाळे रोडला लागुन एक विहीर असुन बाळु माळी यांच्या घराच्या समोर व घराच्या पाठीमागे अशा दोन विहीरी आहेत.

.. ..

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्रमांक ३४/२ ही जमिन संगमनेर—नाशिक महामार्गावर असल्यामुळे त्याचे मुल्य वाढले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमची सर्व्हे क्रमांक ३५/१/१ ही जमिन संगमनेर—नाशिक महामार्गा लगत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आमच्या सर्व्हे क्रमांक ३५/१/१ या जमिनीचे मुल्यांकन बाळु माळीच्या सर्व्हे क्रमांक ३४/२ या जमिनीपेक्षा कमी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २००६ मध्ये ज्या वेळी बाळु माळीने त्याच्या सर्व्हे क्रमांक ३४/२ मध्ये असलेले जुने घर पाडुन नवीन घ ार बांधण्यास सुरूवात केली त्यावेळी त्याच्यात व माझ्यात प्रथम वाद झाला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी सन २००६ मध्ये बाळु माळी विरूध्द पहिला मनाई हुकूमाचा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या गाळपेर क्षेत्र ात बाळु माळीने अतिक्रमण करू नये म्हणुन मी तो मनाई हुकुमाचा दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्याचा निकाल माझ्या बाजुने लागला. हे म्हणणे खरे नाही की, त्या दाव्यातील निकालाचा भंग बाळु माळीने आजपर्यंत केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, बाळु माळीने न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केला म्हणुन मी आज पर्यंत त्याच्या विरूध्द कोणतीही कार्यवाही केली नाही. कार्यवाही केल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी या प्रकरणात दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात मी बाळु माळी विरूध्द तात्पुरता मनाई हुकूम मागितला होता व तो न मिळाल्यामुळे जिल्हा न्यायालयात अपिल देखील केले होते व ते अपिल देखील फेटाळण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, ते अपिल फेटाळण्यात आल्यामुळे मी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका प्रलंबीत असतांना मी आणखी एक नवीन नियमित दिवाणी दावा क्रमांक ४५६/२०२५ संगमनेर न्यायालयात दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाळु माळीचे घराचे बांधकाम सुरू असतांना मी त्याच्याविरूध्द पोलिस ठाणेत तक्रारी दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, बाळु माळीला मुलगा नाही व त्याचे भाउ देखील संगमनेर मध्ये राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे बाळु माळी विरूध्द खोट्या दिवाणी व फौजदारी केसेस करून त्याची जमिन गिळंकृत करावयाचा माझा डाव आहे. हे म्हणणे खरे आहे

की, माझा मुलगा उच्च न्यायालयात वकिल आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्रमांक ३४/२ च्या पुर्वोत्तर कोप—यात एक सर्व्हीसींगचे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या गाळपेर क्षेत्रामध्ये आज पर्यंत बाळु माळीने कधीही हरकत अडथळा केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाळु माळी हा त्याच्या मालकीची जमिन सर्व्हे क्रमांक ३४/२ ची वहिवाट करतो. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५/११/२०१५ व दिनांक १९/११/२०१५ रोजी बाळु माळीने आमच्या गाळपेर क्षेत्रात जेसीबी आणुन खड्डे खोदायला सुरूवात केली, हे दर्शविणारा कोणताही पुरावा माझ्याकडे नाही. आजरोजी माझ्या गाळपेर क्षेत्रात कोणतेही पिक नाही. हे म्हणणे खरे नाही की, बाळु माळी याची जमिन हडप करण्याकरीता मी सदरचा खोटा दावा केला असुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादी क्र.२ ते ५ तसेच ६ चे वारस व प्रतिवादी क्र.७ व ८ गैरहजर असल्यामुळे त्यांच्यातर्फे उलटतपास — काही नाही.</u>**

**<u>सा.वा.दा.ब.अ.क.के.</u>** **श्रवणोत्तर स्विकृती**

JOSHI PRASAD BALKRISHNA

Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2025.08.18 17:38:51 +0530

**दिवाणी न्यायाधीश व.स्तर, संगमनेर.**
**दि. १८/०८/२०२५**

**(प्रसाद बा. जोशी)**
**दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**संगमनेर.**